पुढारी



कोल्हापूर : आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या डॉ. ज्योती जाधव, उपकुलसचिव विलास सोयम यांच्यासह शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. (छाया : पप्पू अत्तार)

लोकमत

# विद्यापीठात उमाजी नाईक यांना अभिवादन

कोल्हापूर : आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात मंगळवारी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ज्योती जाधव, विलास सोयम आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात उमाजी नाईक यांची जयंती

**कोल्हापूर :** आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 SEP 2021
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचे नवे शैक्षणिक वर्ष १ ऑक्टोबरपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या २०२१-२२ या नवीन शैक्षणिक वर्षाला १ ऑक्टोबर २०२१ पासून सुरूवात होणार आहे. या वर्षातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम व द्वितीय सत्राच्या तारखा विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आल्या आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली आहे.

या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे, शिवाजी विद्यापीठाचे नवीन शैक्षणिक वर्ष १ ऑक्टोबर २०२१ पासून सुरू होणार आहे. कला, वाणिज्य, विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे पहिले व दुसरे सत्र कधी सुरू होणार यासंदर्भातील सविस्तर माहिती शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये



- **कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची माहिती**
- **विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रथम व द्वितीय अभ्याक्रमांच्या तारखा जाहीर**

नवीन शैक्षणिक वर्षातील प्रवेश आणि परीक्षांचाही समावेश आहे. तरी विद्यार्थ्यांनी संकेतस्थळाला भेट देऊन जाहीर केलेल्या दोन्ही सत्रानुसार अंमलबजावणी करावी, असे आवाहनही विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

0 8 SEP 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या नव्या शैक्षणिक वर्षाचा एक ऑक्टोबरपासून प्रारंभ

## विविध अभ्यासक्रमांचा समावेश : २९ परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे नवे शैक्षणिक वर्ष दि. १ ऑक्टोबरपासून सुरू होईल. यादिवशी या अभ्यासक्रमांच्या पहिल्या सत्राचा प्रारंभ होणार आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिकशास्त्रे (पदवी अभ्यासक्रम), पदव्युत्तर अभ्यासक्रम (विद्यापीठ व महाविद्यालयीन) प्रथम, द्वीतीय वर्ष, कला व ललितकला, वाणिज्य व व्यवस्थापन (बी. आय. डी., बी. डेस., बी. बी.ए., बी.सी.ए.) पदवी अभ्यासक्रम, व्यवस्थापन (एम. बी. ए., एम. सी. ए., पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रथम आणि द्वीतीय वर्ष), समाजकार्य (पदवी अभ्यासक्रम प्रथम आणि द्वीतीय वर्ष), शिक्षणशास्त्र, विधी, अभियांत्रिकी, टेक्स्टाईल, वास्तुशास्त्र, फार्मसी, आंतरविद्याशाखीय आणि अभ्यास केंद्राअंतर्गत अभ्यासक्रमाच्या पहिल्या सत्राची सुरुवात दि. १ ऑक्टोबर, तर काही अभ्यासक्रमाच्या सत्राची समाप्ती जानेवारी २०२२ आणि काहींची फेब्रुवारीमध्ये होणार आहे. द्वीतीय सत्राचा प्रारंभ मार्च २०२२ मध्ये, तर जूनमध्ये सत्र समाप्ती होईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी मंगळवारी दिली. दरम्यान, विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विविध २९ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल मंगळवारी ऑनलाईन जाहीर केले. त्यात एम. ए. योगाशास्त्र, बी. व्होक. अँडव्हान्स्ड डिप्लोमा इन ऑटोमोबाईल, अँडव्हान्स्ड डिप्लोमा इन प्रिंटिंग अँड पब्लिशिंग, बी. ए.- ड्रेस मेकिंग अँड फॅशन कोऑर्डिनेशन, पी. जी. डिप्लोमा इन न्यूट्रिटेशन अँड डाएटस, बी. एस. डब्ल्यू., एल. एल. बी. थ्री ईअर लॉ पॅटर्न, एम. एससी. ॲप्लाईड केमिस्ट्री, अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बी. डेस, पी. जी. डिप्लोमा इन म्युझिऑलॉजी, ट्रान्स्लेशन, बी. कॉम., बँक मॅनेजमेंट, प्री-लॉ फाईव्ह ईयर लॉ पॅटर्न, एम. एससी. इंडस्ट्रीअल केमिस्ट्री या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

08 SEP 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यातील महाविद्यालये १ नोव्हेंबरपासून सुरू

## इंजिनिअरिंग, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिक्षणाची कोंडी फुटणार

### सीईटी १५ सप्टेंबरपासून

- ८ लाख ५५ हजार ८७९ विद्यार्थी सीईटीसाठी पात्र
- २० ऑक्टोबरपर्यंत निकाल
- इंजिनिअरिंग सीईटी २० सप्टेंबरपासून

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

**अभियांत्रिकी, औषधनिर्माण, कृषीसह राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये १ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात येतील. यासाठीची सीईटी येत्या १५ सप्टेंबर ते १० ऑक्टोबरअखेर होतील, अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केली. राज्यातील आठ लाखांहून अधिक विद्यार्थी सीईटीच्या प्रतीक्षेत आहेत.**

सीईटी परीक्षा १५ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या कालावधीत होणार आहेत. सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी एकूण ८ लाख ५५ हजार ८७९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. या प्रवेश परीक्षांसाठी २२६ केंद्रे निश्चित करण्यात आलेली आहेत. या परीक्षा झाल्यानंतर ही महाविद्यालये १ नोव्हेंबरपासून सुरू होतील, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

राज्य प्रवेश परीक्षा कक्षातर्फे घेण्यात येणाऱ्या तब्बल १५ हून अधिक प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक यंदा जाहीर झालेले नव्हते. याबाबत दै. 'पुढारी'ने विद्यार्थी व महाविद्यालयांचे प्रश्न मांडत पाठपुरावा केला होता. अखेर मंगळवारी मंत्री सामंत यांनी परीक्षांच्या तारखा जाहीर करत विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. राज्यात २२६ केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. मात्र, आणखी केंद्रे वाढली जाणार असल्याचे पान ४ वर ▸

# राज्यातील महाविद्यालये १ नोव्हेंबरपासून सुरू

(पान १ वरून) सांगत, यावर्षी या परीक्षांसाठी प्रतिदिवस जास्तीत जास्त ५० हजार संगणक उपलब्ध करण्यात आलेले आहेत. त्यातील २५ हजार संगणक अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थ्यांच्या संख्या व विद्यार्थ्यांनी दिलेल्या पर्यायानुसार निश्चित करण्यात येणार आहेत. कोरोनाविषयक नियमांचे पालन करून परीक्षा होणार आहेत.

प्रवेशाची नोंदणी प्रक्रिया अभ्यासक्रमनिहाय सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरू करण्यात येईल व अभ्यासक्रमनिहाय प्रवेश प्रक्रिया १५ ऑक्टोबरनंतर सुरू करण्यात येणार आहे. या परीक्षेचा निकाल २० ऑक्टोबरपर्यंत जाहीर करण्यात येणार असून, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नोव्हेंबरपासून सुरू होईल. हे शैक्षणिक वर्ष सुरू करताना राज्यातील त्यावेळची कोरोनाची परिस्थिती पाहून ऑनलाईन सुरू करायचे की ऑफलाईन याबाबत निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री यांनी यावेळी सांगितले.

राज्य सीईटी कक्षाच्या www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर तपशीलवार वेळापत्रक देण्यात येणार आहे.

### विविध सीईटी परीक्षांच्या तारखा अशा...

१) मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर इन हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन, बॅचलर ऑफ आर्ट्स, बॅचलर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ एज्युकेशन या परीक्षा १५ सप्टेंबर रोजी होणार आहेत.

२) मास्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन, मास्टर ऑफ बिजनेस ॲडमिनिस्ट्रेशन अँड मॅनेजमेंट स्टडी या परीक्षा १६, १७ व १८ सप्टेंबर रोजी होणार आहेत.

३) बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग/टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ फार्मसी, ॲग्रीकल्चर अँड अलाईड कोर्स या परीक्षा दि. २० सप्टेंबर ते १ ऑक्टोबर यादरम्यान होणार आहेत.

४) बॅचलर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ एज्युकेशन अँड मास्टर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ लॉ (५ वर्षे), बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन या परीक्षा ३ ऑक्टोबर रोजी होणार आहेत.

५) बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन दि. ४, ५, ६ आणि ७ ऑक्टोबर २०२१ रोजी होणार आहेत. तसेच बॅचलर ऑफ लॉ (३ वर्षे) ४ व ५ ऑक्टोबर, बॅचलर ऑफ एज्युकेशन जनरल अँड स्पेशल, या परीक्षा ६ व ७ ऑक्टोबर २०२१ रोजी होणार आहेत. बॅचलर ऑफ फाईन आर्ट ९ व १० ऑक्टोबर २०२१ रोजी होणार आहेत.

**२० ऑक्टोबरपर्यंत निकाल**

प्रवेशाची नोंदणी प्रक्रिया अभ्यासक्रमनिहाय सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरू करण्यात येईल व अभ्यासक्रमनिहाय प्रवेश प्रक्रिया १५ ऑक्टोबरनंतर सुरू करण्यात येणार आहे. या परीक्षेचा निकाल २० ऑक्टोबरपर्यंत जाहीर करण्यात येणार आहे. शैक्षणिक वर्ष सुरू करताना राज्यातील त्यावेळची कोरोनाची परिस्थिती पाहून ऑनलाईन सुरू करायचे की ऑफलाईन, याबाबत निर्णय घेण्यात येईल. परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दिवशी मुंबईमध्ये लोकल प्रवासाची मुभा देण्यात येणार आहे.

**परदेश शिक्षणासाठी उत्पन्नाची अट शिथिल**

खुल्या प्रवर्गातील 'गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे' या योजनेच्या लाभासाठी विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून ८ लाख रुपये इतकी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पूर्वी ही मर्यादा २० लाख होती. आता ८ लाख केल्याने अधिकाधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे.

**एमएचटी सीईटी**

**२० सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत**

औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, कृषी आणि अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी महत्त्वाच्या असलेल्या एमएचटी सीईटी प्रवेश परीक्षेला २० सप्टेंबरपासून सुरुवात होत आहे. या परीक्षेसाठी राज्यातून ५ लाख ५ हजार ७८८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यामध्ये पीसीएम गटातून २ लाख २८ हजार ४८६, तर पीसीबी गटातून २ लाख ७७ हजार ३०२ नोंदणी केली आहे. सर्वाधिक विद्यार्थी या सीईटीसाठी आहेत.

पुण्यनगरी

# पत्रकारिता विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनांतर्गत सुरू असलेल्या 'पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम' या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. वीज कामगार भवनातील कॉ. दत्ता देशमुख सभागृहात हा समारंभ झाला. अध्यक्षस्थानी पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख आणि अध्यासनाचे माजी चेअर प्रोफेसर डॉ. रत्नाकर पंडित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि डॉ. पंडित यांनी मार्गदर्शन केले.